# प्रसिध्दी पत्रक

दिनांक : ३१/०७/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे. हिमायतनगर गुरनं ७८/२०१६ कलम ७, १३ (१) (ड) सह कलम १३ (२) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ३१.०५.२०१६ रोजी ०१.१६ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | सुनिता दत्तात्रय गोपेवाड, वय ३६ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद लिपिक नेमणुक तहसिल कार्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड |
| झालेली शिक्षा | दिनांक ३१.०७.२०२४ रोजी नमुद आरोपी लोकसेविका यांचेविरुद्ध आरोप सिद्ध झाल्याने भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ मध्ये १ वर्षाचा कारावास व १,०००/– रुपये द्रव्यदंड आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम १३ मध्ये २ वर्षाचा कारावास व ३,०००/– रुपये द्रव्यदंड आणि द्रव्यदंड न भरल्यास तीन महिन्याचा वाढीव कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार, यांना त्यांचे मौजे आंदेगाव येथील शेत गट नंबर २२५ ची फेरफारची नक्कल देण्याच्या कामासाठी नमूद आरोपी लोकसेविका यांनी लाचेची मागणी करून पंचासमक्ष लाच स्विकारल्यावरून लाप्रवि नांदेड पथकाने त्यांना रंगेहात पकडून पोलीस स्टेशन हिमायतनगर येथे गुरनं ७८/२०१६ कलम ७, १३ (१) (ड) सह कलम १३ (२) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याच्या तपासाअंती सबळ पुराव्यासह मा.न्यायालयात आरोपी लोकसेविका यांचे विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आला होता.<br>सदर खटल्याची सुनावणी मा.तदर्थ जिल्हा न्यायाधीश – १, भोकर, जिल्हा नांदेड यांचे समोर झाली. त्यामध्ये पोलीसांनी केलेला तपास व महत्वाच्या साक्षीच्या आधारे मा. न्यायालयाने आरोपी लोकसेविक सुनिता दत्तात्रय गोपेवाड, वय ३६ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद लिपिक नेमणुक तहसिल कार्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड यांना आज दिनांक ३१.०७.२०२४ रोजी आरोप सिद्ध झाल्याने भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ मध्ये १ वर्षाचा कारावास व १,०००/– रुपये द्रव्यदंड आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम १३ मध्ये २ वर्षाचा कारावास व ३,०००/– रुपये द्रव्यदंड आणि द्रव्यदंड न भरल्यास तीन महिन्याचा वाढीव कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.<br>नमुद गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. बळवंत पेडगांवकर, ला.प्र.वि. नांदेड यांनी करून मा. न्यायालयात खटला दाखल केला होता. सदर खटल्याचे कामकाज पैरवी अधिकारी पोनि श्री जमीर नाईक यांनी केले व त्यांना कोर्ट अंमलदार पोना/१७९८ प्रदिप कंधारे यांनी मदत केली. |
| गुन्हयाचा तपास | श्री. बळवंत पेडगांवकर, तत्कालीन पोलीस निरीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फ्री कमांक– 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

कार्यालय,पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड,युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner